REIKI VIDYA NIKETAN

सर्वे: सन्तु निरामया:

# रेकि ब्रह्म

वर्ष ८वे अंक १२वा । सप्टेंबर २०२०





# पंचतत्वांचे मंदिर...

गेल्या पाच महिन्याच्या लॉकडाऊनच्या कठीण काळात आपण स्वीकारलेल्या दिनक्रमाने आम्हाला तारून नेले नाहीतर कठीण होते हे ऐकले कि कोठेतरी एक कृतार्थता हृदयाला भिडून जाते. पहाटेला उठून केलेले अग्निहोत्र, त्यानंतरची योगनिद्रा, प्राणायाम, कवच, भावातीत ध्यान, रूद्र अध्यायाचे पठण, रूद्र स्वाहाकार, त्र्यंबक होम, पंचकोश, सेंटरिंग इ. ध्याने आणि या सर्वांच्या जोडीला ही पंचतत्वे एवढे केले कि करोनाच नव्हे तर प्रत्यक्ष यमाला सुद्धा विचार करायला लागेल अशी अवस्था. या सर्व क्रियांच्या मध्ये रेकिची पाच तत्वे म्हणजे त्या क्रियांचा पंचप्राण. आपल्या दृष्टीने पांच तत्वे पण ती तत्वे हा संपूर्ण रेकि परंपरेचा एक मोठा संकल्प आहे हे आपण कदाचित जाणलोच नाही. रेकिच्या पहिल्या श्रेणीतील रेकिची पाच तत्वे ही तर आपल्या संपूर्ण अध्यात्मिक जीवनाचा पायाच आहे. रेकिची साधना म्हणजेच रेकिची ही पाच तत्वे अंगात बाणवणे हेच साधनेचे व्यक्त स्वरूप आहे.

यातील पहिले तत्व म्हणजे रेकि मंदिराचा पायाच जणू. आपल्या अस्तित्वात कृतज्ञता सातत्याने बाळगली कि अध्यात्माचा अर्धा मार्ग मोकळा झाला म्हणायला हरकत नाही. कृतज्ञतेचा मनात एकदा का विचार रूजला कि आयुष्यामध्ये सकारात्मकतेशिवाय काहीच रहात नाही. मग आयुष्यच एक मोठ्ठा आशिर्वाद बनतो. आयुष्य हा आपला अधिकार आहे असे मानून जगणाऱ्या आजच्या पिढीला हे समजणे जरा कठीणच. अधिकाराचे अधिष्ठान अहंभावात असते तर आशिर्वादाचे आत्म्याच्या स्थानात. आत्म्याच्या आशिर्वादात सातत्याने राहणे यापेक्षा आयुष्यात काय असू शकते? आपल्या केवळ जन्माने संपूर्ण विश्व मोहरून उठत असते हे आपल्याला जेव्हा कळते ना तेव्हा मग आयुष्याच्या कणाकणामध्ये आनंदाचे झरे वाहतात. संपूर्ण विश्व जेव्हा आपल्या कौतुकात डुंबुन जाते तेव्हा जवळपासचे प्रत्येक झाड वैद्य बनून आपले स्वास्थ्य राखते, प्रत्येक तलाव, सरोवर, नदी आपली तहान भागवण्यासाठी आतुर होतात, मधुर फळांनी लगडलेली झाडे मग आपली भूक मिटवण्यासाठी नम्रपणे आपली वाट अडवतात. आकाशातील मेघांना उमाळे येऊन मग पावसाची बरसत होते आणि या काळ्याकुट्ट मेघांच्या गर्दीतून मग सूर्य, चंद्र, तारका हळूच डोकावून आपल्या बाळाच्या दर्शनाची तहान भागवून घेतात. आपण निसर्गाचे बाळ आहोत हेच आपण विसरले आहोत. हा एक विचार आयुष्याचे सोने बनवून टाकतो.

एकदा का कृतज्ञतेची बैठक बसली कि मग निर्भयतेच्या आणि नि:शंकतेच्या भिंती त्यावर उभारायच्या. प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या बरोबर असताना कशाला भ्यायचे आणि कशाला नकारायचे? आईच्या मांडीवर अतिविश्वासाने बसलेल्या छोट्या बाळाला कशाची फिकीर? कसल्या चिंता आणि कसल्या काळज्या? परमेश्वराच्या बाळाने चिंता करणे हा त्या परम पवित्र परमेश्वराचा अपमान आहे याची जाण रेकि साधकाला असायलाच हवी. राग, क्रोध तेच करतात जे असहाय्य आहेत. ज्याच्या धमन्या–धमन्यांमधून रेकिच्या प्रवाहाचे निर्झर खळाळताहेत, ज्याच्या श्वासाश्वासात रेकिच्या अखंड लाटा सातत्याने उमटत आहेत त्या साधकाला अशक्य ते काय? मग त्याला क्रोध कशाचा यायला हवा? ज्या हृदयामध्ये फक्त क्षमाशीलतेचे आणि दयाभावाचे हुंकार उमटायला हवेत त्या हृदयामध्ये क्रोधाचा अंगार कसा असू शकेल?

ह्या दोन भिंती उभ्या राह्यल्या कि मग त्यावर छप्पर चढवायचे असते ते आपल्या प्रामाणिकतेचे. प्रत्येक क्षणाला तो परमेश्वर आपल्याला पाहत आहे त्याला फसवूच कसे शकतो आपण? आपण खरे म्हणजे कोणालाच फसवत नाही तर फक्त स्वत:लाच आणि आपल्यातील त्या दिव्य आत्मतत्वाला फसवत असतो. आणि प्रत्येक क्षणाला 'तो' साक्षीभावाने पाहत असतो. त्याला फसवून कोठे जायचे साधकाने? एकदा का साधकाला हे जमले कि आत्मसत्तेचे मंदिर जवळ जवळ तयार झालेच समजायचे.

आणि अशा या मंदिरावर मग पाचव्या तत्वाचे म्हणजे समस्त जीवांचे प्रेमपूर्वक व आदरपूर्वक स्वीकार करण्याचे शिखर बसवायचे. "जीव जीव सुखी व्हावा स्वर्ग यावा पृथ्वीवर" ह्या माडगूळकरांच्या ओळी मग पुस्तकाच्या कागदावरून आपल्या हृदयात उमटतात आणि मग ते वाक्य एक अनुभव म्हणून जगता येते. आणि अशा ह्या मंदिरात मग परमेश्वर आपले अस्तित्व सदासाठीच स्थित करतो. तीच प्राण प्रतिष्ठा. पंचतत्वांचे मंदिर सर्व रेकि साधकांच्या जीवनात उभे राहो हीच या गणेश चतुर्थीला श्री गजाननाच्या चरणांपाशी प्रार्थना।

सर्वेत्र: सुखिन: सन्तु, । सर्वे सन्तु निरामया: ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दुक:माप्नुयात ॥

जय गुरूदेव
**अजित सर**
दिनांक: २० ऑगष्ट २०२०



अमृतधारा

# कवच

**भाग्यश्री पुरोहीत**

गुरुमाऊलीने हात
माझ्या माथी फिरवला
लोखंडाचे सोने झाले,
जसा परिस स्पर्शला ॥

नाम घेता गुरुमाय
डोळे मिटती प्रेमाने
मुखी शब्द काय बोलू
कंठ ओलावे भावाने ॥


पाठीतून वीज धावे
फुले निखावा श्वासाचा
कसा थोपवावा वेग?
जसा भाता लोहाराचा

मिटतात गच्च डोळे
कंपने कंपने कंठात
खेळवितो जो श्वासाला
बसलासे कुठे आत ॥

डोळे पाझरती पाणी
वाटे टाहो मी फोडावा
गर्जावे नाभितून
जीव शिवाला मिळावा ॥

पुन्हा होता त्याचा स्पर्श
पाठीवर हात फिरे
सारे शांत एका क्षणी
मन सुंगधाने भरे ॥





# वेगवती गंगा... वेदवती गंगा...

तेजश्री रानडे, देवगड.

"थंडगार वाऱ्याची झुळुक येत आहे, अंतरमनातून बासरीचे सुमधुर सूर उमटत आहेत, समोर गंगेचा निर्मळ, अविरत वाहणारा प्रवाह... सूर्याची तांबूस सोनेरी किरण गंगेच्या त्या नितळ पाण्यात पडली आहेत... अशातच डोळे आपोआप मिटले जात आहेत. जी गंगा बाहेर वाहत आहे तिच पवित्र गंगा अंतरातही वाहत आहे.. पावन करत आहे संपूर्ण अस्तित्वाला... आत्माष्टकाचे दिव्य शब्द कानी पडत आहेत.. 'चिदानंद रुपम्.. शिवोहम शोवोहम'. केवळ आत्मानंदाची अनुभुती, दिव्यत्वाचा प्रकाश आणि गंगामाईच्या पवित्र जलप्रवाहातून अविरत उमटणारा ब्रम्हनाद.. 'चिदानंद रुपम्.. शिवोहम शोवोहम'. हे एक स्वप्न तर नाही ना? खरं आहे.. तूर्तास हे एक स्वप्नंच आहे. परंतु अगदी मनापासून पाहिलयं मी. माहित नाही पूर्ण होईल की नाही पण अशी दिव्य स्वप्नं पाहायला तरी काय हरकत आहे? नाही?

"आपण अशा एका महान संस्कृतीत जन्माला आलो आहोत जी संस्कृती आपल्यावर निसर्गाशी नातं जोडण्याचे संस्कार करते. मग आकाशातला चंद्र आपला चंदामामा होतो.. वाहणारी नदी आपली माता होते. अशा महान संस्कृतीचे आपण घटक आहोत." ही वाक्य माझी नाहीत तर आपल्या गुरुजींची आहेत. खरंच किती अलौकिक विचार आहे हा. एखाद्याशी जेव्हा आपण नातं जोडतो तेव्हा सहाजिकच त्याच्याप्रती मनात आदर निर्माण होतो. मग ती एखादी व्यक्ती असो अथवा एखादी नदी. अशीच अखंड, अविरत वाहणारी गंगा नदी, जिला आपण केवळ गंगा नाही तर माई किंवा मय्या म्हणतो, गंगामाई.. गंगामय्या..

पुराणांमध्येही जिला महत्वाचं स्थान दिलं आहे, जिला पूजनिय मानलं आहे. असं म्हणतात जिच्या प्रवाहात एकदा स्नान केल्याने जन्मजन्मांतरीची पापं धूतली जातात, जिला साक्षात महादेवांनी आपल्या जटांमध्ये धारण केलं आणि भगिरथाच्या तपश्चर्येचं फळ म्हणून धरतीच्या उध्दारासाठी प्रवाहीत केलं ती भागिरथी आणि तिच पतितपावन गंगामाई...

माहित नाही का परंतु आज मला गंगामाईविषयी भरभरून लिहावसं वाटत आहे. मी आजवर तिला कधी ओझरतंही पाहिलं नाही. मी येथे कोकणात आणि ती हिमालयातून बंगालपर्यंत प्रवाहीत. कितीतरी हजार किलोमीटर अंतर आहे आमच्यात. तिला मी पाहिलं ते फक्त टेलिव्हिजनवर आणि इंटरनेटवर. पण तरीही येथे माझ्या खोलीमध्ये बसून 'गंगामाई' एवढं जरी म्हटलं ना, तरी अंगावर शहारे येतात... डोळ्यात तिच गंगा दाटून येते.. असं का होत असेल? असं काय आहे तिच्यात की केवळ नाव घेताच पवित्रतेचा अनुभव येतो? कधीही न पाहिलेल्या, एखाद्या नदिविषयी भरभरून बोलावसं वाटणं, लिहावसं वाटणं यातच तिची महानता, पवित्रता प्रत्यक्ष होते.

गंगा उत्तराखंड राज्यातील गंगोत्री पासून जवळजवळ १८ किमी असलेल्या गोमुख या हिमखंडापासून उगम पावते. उगमाकडे छोटीशी धारा असलेली गंगा पूढे महाकाय रुप धारण करते. गोमुखापासूनच तिचा प्रवास सुरु होतो. गंगोत्री, रुद्रप्रयाग, देवप्रयाग, ऋषिकेश, हरिद्वार, कानपूर, अलहाबाद (ज्याला प्रयागराज असंही म्हणतात. कारण तिथे गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा त्रिवेणी संगम आहे), वाराणसी म्हणजेच शिवाची प्रिय नगरी काशी, भागलपूर, कलकत्ता ही आणि अशी अनेक गावं, शहरं घेत शेवटी गंगासागर येथे हिमालयकन्या गंगा बंगालच्या खाडीत समाविष्ट होऊन सागराला मिळते.. असा जवळजवळ २५०० किमी चा प्रवास तो रोज करत आली आहे.. अगदी युगानयुगे.

तिच्या या प्रवासात कधीही खंड पडला नाही. तिचा प्रवाह एक सेकंदभरासाठीसुध्दा थांबला नाही. गोमुखातून उगम पावलेली गंगा सतत धावत राहते सागराला मिळण्यासाठी. त्या विशाल सागरात आपलं अस्तित्व मिसळून जावं आणि पूर्णत्व प्राप्त व्हावं यासाठी तिचा हा प्रवास सतत चालू असतो. एकदा सागराला मिळालेली गंगा पुन्हा पुन्हा नव्याने सागराला मिळत राहते. तिच्या या प्रवासात ती किती मोठा परमार्थ करते. तिच्या तीरावर वसलेल्या तसंच तिच्या उदरात राहणाऱ्या प्रत्येक जीवावर ती आपल्या मातृत्वाचं सिंचन करते. केवळ मानवच नाही तर पशू-पक्षी, वनस्पती, मासे व अन्य जलचर यांना आपल्या निर्मल जलाने पोशित करते. म्हणूनच कदाचित ती नदी असूनही माता आहे.

गंगा कोणातही भेदभाव न बाळगता आपल्या साऱ्याच लेकरांवर समान माया करते. पण आपण त्या ममतेचं मोल खरंच जाणतो का? आपलं खरंच तिच्यावर प्रेम आहे का? की फक्त तोंडदेखलं तिला माता म्हणत आहोत आपण? हे आणि असे असंख्य प्रश्न आपण आपल्याला विचारले पाहिजेत... त्याचं कारण आहे 'गंगाप्रदुषण'. आपण गंगादर्शनासाठी गंगाघाटावर जातो, किनाऱ्यावर तिची पूजा करतो, जन्मजन्मांतरीची पापं धूतली जावीत म्हणून तिच्या जलात स्नान करतो. गंगा आपल्या पापाचम् क्षालन करून आपल्याला शुध्द करेल अशी अपेक्षा करतो.. श्रध्देने तिला हात जोडतो आणि याच श्रध्देबरोबर प्लास्टिक व कचराही देतो तिला. मग अशा श्रध्देला श्रध्दा म्हणावं का? प्रासारमाध्यमावर गंगाप्रदुषणाचे असंख्य व्हिडिओज बरेचदा दाखवले जातात. सरकारच्या निष्काळजीपणावर ताशेरे ओढले जातात. ते पाहून कितीतरी लोक आपल्या फेसबुक सारख्या सोशल नेटावर्किंग साईटवर भल्या मोठ्या पोस्ट करतात. मी अशा कितीतरी पोस्ट वाचल्या आहेत फेसबुकवर ज्यात गंगाप्रदुषणाकडे सरकारचं कसं दुर्लक्ष झालं आहे याचा पाढाच जणू वाचलेला असतो. पूर्वी मलाही अशा पोस्ट वाचून चिड जायची सरकारची पण जेव्हा मी दूरदर्शन वाहिनीवर 'रग रग मे गंगा' नावाचा कार्यक्रम पाहीला तेव्हा माझं मतच बदललं. या कार्यक्रमाच्या माध्यमातून लक्षात आलं की सरकार आता खरंच कामाला लागलयं. 'नमामी गंगे' सारख्या गंगाशुध्दीकरणा प्रकल्पाच्या अंतर्गत कितीतरी 'सिवेज ट्रिटमेंट प्लांट', 'इफ्लूएन्ट ट्रिटमेंट प्लांट' उभारले गेले आहेत आणि हे सगळे प्लांट चालू अवस्थेत आहेत. दरदिवशी जवळजवळ चौदा करोड लिटर सांडपाणी आणि इतर कचरा गंगेत टाकणारे कितीतरी नाले आज सरकारने बंद करून त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून मगच गंगेत सोडण्याचं अविरत काम सुरु केलं आहे. गंगा आधी पेक्षा खुप स्वच्छ झाली आहे आणि हे सरकार नाही तर गंगा किनारी राहणारे साधू-संन्यासी, शेतकरी, मच्छीमार लोक म्हणू लागले आहेत. आणि हे लोक ते आहेत जे गेली कितीतरी वर्षे नेमाने गंगेला पहात आले आहेत.

म्हणजेच सरकारने ठोस पावलं उचलली आहेत. आता आपली ही जवाबदारी बनते की आपणही यात आपला वाटा उचलला पाहिजे. जो बदल आता होऊ लागला आहे त्या बदलाचा आपणही एक हिस्सा बनलं पाहिजे. गंगेच्या पाण्यात कोणत्याही प्राकारचा कचरा न टाकून खऱ्या अर्थाने गंगामाईचं पावित्र राखलं पाहिजे आपण.


भविष्यात आपण जेव्हा गंगाकिनाऱ्यावर दर्शनासाठी जाऊ तेव्हा तिची पूजा करताना तिच्या पाण्यात डुबकी मारताना 'तिच्या पाण्यात कोणताही कचरा टाकायचा नाही' हे पक्क पाहिजे आपल्या मनात. आणि हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा आपण आपल्या घराजवळच्या नदी-नाल्यापासून सुरुवात करू. गंगा ही तर साऱ्या नद्यांची प्रतिनिधी आहे. अशा अनेक नद्या गोदावरी, नर्मदा, यमुना, कावेरी आणि कितीतरी.. आपलं कर्तव्य आहे की गंगेएवढंच पावित्र्य आपण साऱ्याच नद्याविषयी राखलं पाहिजे. हेच खरं गंगामाईला वंदन असेल आणि मला खात्री आहे की हा जो परिवर्तनाचा काळ सुरु झाला आहे त्यात आपण सारेच एकत्र होऊन सहभागी झालो तर गंगाच नव्हे तर साऱ्याच नद्या आणि पर्यावरण स्वच्छ सुंदर बनेल.

मी गंगेला प्रत्यक्ष कधी पाहिलं नाही. माझा फारसा अभ्यासही नाही तिच्याविषयी. पण प्रत्येक साधकासाठी ती एक आदर्श आहे, असं मला वाटतं. तिचा 'गोमुख ते गंगासागर' हा प्रवास पाहता 'परोपकार, परमार्थ' काय असतात, तसंच आपल्या पूर्णत्वाबरोबर जमेल तेवढ्या साऱ्यांच्या कल्याण्यासाठी झटत राहणं काय असतं हे तिच्याकडून किंबहूना साऱ्याच नद्यांकडून एका साधकाने जरूर शिकावं.

या लेखाच्या सुरुवातीला जे स्वप्न मी सांगितलं ते जेव्हा साकार होईल तेव्हा या लिखाणाला खऱ्या अर्थाने पूर्णत्व प्राप्त होईल. जेव्हा गंगाकिनारी बसून त्या गंगाधाराच्या स्तुतीचे शब्द.. तोच तो ब्रम्हनाद अंतरंगाच्या गाभाऱ्यात उमटेल आणि दशदिशांमध्ये घुमेल तेव्हा झालेला आनंद अलौकिक असेल. चिदानंद असेल. 'चिदानंद रुपम्... शिवोहम शोवोहम' याच ब्रम्हनादाबरोबर फक्त गंगेविषयीच नाही तर साऱ्या जगताविषयी प्रेम आणि करूणा गंगेप्रमाणेच प्रवाहित होईल. समोर वाहणारी वेदवती गंगा प्रेम आणि करूणेच्या स्वरुपात संपूर्ण अस्तित्वातून वेगवती होईल. हात जोडले जातील आणि आनंदाच्या, शांतीच्या त्या परमोच्च स्थितीत असताना मुखातून दिव्य प्रार्थनेचे शब्द निघतील,

**सर्वेत्र सुखिनः भवन्तु, सर्वे सन्तु निरामय**
**सर्वे भद्राणी पश्चन्तु, मा कश्चित् दुःखमाप्नयात् ।**

नमामी गंगे..



(भाग ३४वा)

# तेलंग स्वामी

## एक अद्भुत अस्तित्व

### अनुवादक – सौ. शुभदा गर्गे, नाशिक

चौदाव्या दिवशी भल्या पहाटे गंगास्नान करून ते आश्रमात पोहोचले. तेलंगस्वामींना नमस्कार करून त्यांची चरणधूळ सर्वांगाला लावून त्यांच्याजवळ बसले. संत संगत मिळताच मनातील दोषांचे आवरण गळून पडले. उमाचरणजी स्वत:ला पवित्र समजू लागले.

थोडयाच वेळात स्वामीजींनी इशारा करताच मंगलदासांनी उमाचरणजींना एक छोटासा दगड,गेरू आणि एक लोटीभर पाणी आणून दिले व सांगितले की स्वामीजींनी हे घासण्यास सांगितले आहे. उमाचरणजी दुपारपर्यंत गेरू घासत होते. स्वामीजींनी दुपारनंतर खुणेनेच त्यांना सांगितले की घासलेला गेरू बाजुला एका भांडयात ठेऊन घरी जाऊन भोजन करुन या.

त्यानुसार उमाचरणजी जेऊन तिसऱ्या प्रहरी परत आले. पुन्हा गेरू घासण्यास सांगण्यात आले. उमाचरणजी हे काम करत असतानाच आश्रमात एक ब्रम्हचारीबुवा आले व घासलेल्या गेरूने भींतीवर श्लोक लिहू लागले. बघता–बघता घासून ठेवलेला सर्व गेरू संपून गेला.

संध्याकाळी घासलेला गेरू भांडयात ठेवून स्वामीजींना नमस्कार करून उमाचरणजी घरी गेले. पंधराव्या दिवशी स्नान आटोपून उमाचरणजी आश्रमात येताच स्वामीजींनी त्यांना पुन्हा तेच काम करण्यास सांगितले. गेरू घासता घासता हात दुखायला लागला व साहाजिकच वेग मंदावला. स्वामीजींनी लगेच खूण करून जोरजोरात घासण्यास सांगितले. घाबरून उमाचरणजी जोरजोरात उगाळायला लागले. दुपारी भोजन करून येताच पुन्हा संध्याकाळ पर्यंत तेच काम करत होते.

याप्रकारे सलग पंधरा दिवस उमाचरणजी गेरू उगाळण्याचे (घासण्याचे) काम करत होते. हात इतके दुखत होते की घास घेणेही शक्य होईना. त्यांना विचार पडला की असे कोणते महापाप केले की ही शिक्षा वाटयास आली. काही बोलण्याचे किंवा विचारण्याचेही धाडस होत नव्हते. उमाचरणजी जेवढा गेरू दिवसभर घासायचे, ब्रम्हचारी संध्याकाळी श्लोक लिहून सर्व संपवून टाकायचे.

अठ्ठावीस दिवस असेच गेले. एकोणतीसाव्या दिवशी स्नानानंतर अंगही पुसता येईना. तेव्हा उमाचरणजींना वाटले की आज काही हे काम करणे शक्य नाही. स्वामीजींनी घालवून दिले तर काय?

आश्रमात जाऊन स्वामीजींच्या पायावर डोके ठेवून ते रडू लागले. स्वामीजींना त्यांची व्यथा कळाली. त्यांनी खुणेनेच मंगलदासकरवी उमाचरणजींना हिंदी वाचता येते का विचारले. उमाचरणजी म्हणाले, “बरीच वर्षे बिहार मध्ये राहिल्याने हिंदी चांगले येते. स्वामीजींनी एक मोठे बाड काढून उमाचरणजींच्या हाती दिले व मंगलदासांकरवी सांगितले, “ह्यातल्या कागदांवर जेवढे श्लोक लिहीले आहेत त्या सर्वांचे बंगालीत भाषांतर करायचे आहे.

उमाचरणजींना आनंद झाला. गेरू घासण्याच्या कामातून सुटका झाली. याचेही बरे वाटले. त्वरीत बाजारातून कागद, पेन व शाई आणून त्यांनी काम सुरु केले. प्रत्येक कागदावर खाली ते आपली सही करू लागले.

पाच दिवसात भाषांतराचे कार्य संपूर्ण झाले. स्वामीजींनी वाचण्यास सांगितले. वाचन झाल्यावर बाड जागेवर ठेऊन दुसरे बाड काढून भाषांतर करण्यास सांगितले. हे बाड जरा लहान असल्याने तीन दिवसात संपले. पुन्हा वाचून दाखवण्यास सांगितले व नंतर जागेवर ठेऊन दिले. नंतर जेवणाची सुट्टी झाली.

आश्रमात जेऊन तिसऱ्या प्रहरी उमाचरणजी स्वामीजींकडे गेले. स्वामीजींनी एकदा त्यांच्याकडे पाहिले व आरामात पाय लांब करून झोपून गेले. उमाचरणजींनी त्यांची पायधूळ घेऊन सर्वांगास लावली. स्वामीजी शांतपणे पडले होते. उमाचरणजींना वाटले आपले प्रश्न विचारायला चांगली संधी आहे. ते असा विचार करत असतानाच स्वामीजींनी मंगलदासांकरवी त्यांना निरोप दिला की, “उद्या सकाळी न येता संध्याकाळनंतर माझ्याजवळ यावे.”

उमाचरणजी घरी गेले. त्यांना अगदी मोकळे मोकळे वाटत होते. गेरू घासायचा नव्हता व भाषांतरही करायचे नव्हते.
क्रमश:



# गंगालहरी

मृणाल कुटुंबळे, वडोदरा.

भारताचा इतिहास मुळात अद्‌भुत आणि अनेकविध घटनांनी नटलेला आहे. काळाच्या गर्भात अनेक रहस्ये, काही अनुत्तरीत प्रश्न दडलेले आहेत, ज्यांच्यापर्यंत आपण कधीच पोहोचू शकणार नाही. आज आपण अशाच एका अद्‌भुत घटनेबद्दल जाणून घेणार आहोत.

मूळ आंध्रप्रदेशचे रहिवासी त्यानंतर उत्तर भारतात येऊन स्थायिक झालेल्या एका विद्वान परिवारात जगन्नांथांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पेरुभट्ट आणि आईचे नाव लक्ष्मी होते. जगन्नाथ बालपणापासून मातृपितृभक्त होते. जगन्नाथ वेदशास्त्राचे पठण करायचे. त्यांच्या पत्नीचे नाव भामिनी होते. त्यांच्या पत्नीचा देहांत खूप लहान वयात झाला. जगन्नाथांनी वेदांत, न्यायविषयक शिक्षण, महाभाष्य, पूर्वमीमांसा इ. विविध विषयांचे शिक्षण त्यांचे वडिल आणि त्यांचे गुरु शेष वीरेश्वर यांच्याकडून घेतले. जयपूरच्या राजाच्या आग्रहावरून ते जयपूरला आले. तिथे त्यांनी एका संस्कृत पाठशाळेची स्थापना केली. एकदा दिल्लीच्या दरबारात झालेल्या शास्त्रार्थात त्यांनी एका काजीला हरवले. पुढे बादशहाची मुलगी 'लवंगी' हिच्याशी पंडितांनी लग्न केले. तिला घेऊन ते काशीला आले. तिथे गंगेच्या घाटावर ते एक कुटीर बांधून राहू लागले. गंगामैयाची भक्ती करून तपश्चर्या करू लागले. काशीच्या पंडितांना हे काही पटले नाही. त्यांनी पंडितांचा बहिष्कार केला. त्यांना त्रास दयायला सुरुवात केली. ते जगन्नाथांना गंगास्नान करू द्यायचे नाही. या त्रासाला कंटाळून एक दिवस ते घाटावर बसून गंगेची स्तुती करू लागले. त्यांची एकनिष्ठ भक्ती पाहून गंगा त्यांना भेटायला आतुर झाली. जसे जसे ते एक एक पद रचायचे गंगेचे पाणी एक एक पायरी वर येऊ लागले. ५२वा श्लोक रचल्यावर गंगा थेट ५२ व्या पायरीवर आली आणि पंडितांना त्यांच्या पत्नीसहीत पाण्यात नेऊ लागली. तेव्हा पंडितांनी गंगेला याचना केली मला ह्या संसाररुपी चिखलातून बाहेर काढून तुझ्या पाण्यात सामावून घे आणि त्या दोघांना गंगेच्या प्रवाहात मोक्ष मिळाला. तेच काव्य 'गंगालहरी' म्हणून प्रसिध्द झाले. ज्याचे ५२ श्लोक आहेत. ह्या काव्याला 'पियुषलहरी' असेही म्हणतात.

काशीचे पं. जगन्नाथ मिश्र महापंडित, शास्त्रकार तसेच रससिध्द कवी होते. अध्यात्मापासून शृंगाररसापर्यंत त्यांनी काव्ये लिहिली आहेत. त्यांना संस्कृत सह फारसी भाषा पण येत होती. भारतीय संस्कृतीत गंगेचे खूप महत्व आहे. या काव्यात त्यांनी गंगेची स्तुती केली आहे. ज्या काळात संस्कृत भाषेचे वैभवाचे दिवस लुप्त होत होते. त्या काळात पंडितांनी संस्कृत साहित्याची निर्मिती केली आणि विश्वाला संस्कृत भाषेची सुंदरता, सौष्ठव आणि वैचारिकता निदर्शनास आणून दिली.

असे म्हणतात की पं. जगन्नाथ मिश्र ह्यांनी लहानमोठी एकवीस काव्य रचली. गंगालहरी, अमृतलहरी, सुधालहरी, करूणालहरी, लक्ष्मीलहरी, विष्णूलहरी अशी काव्ये तर, त्यांची प्रथम पत्नी भामिनीच्या मृत्यूनंतर रचलेले भामिनीविलास, आसफविलास, प्राणामरणम, जगदामरणम, रसगंधार इ. विविध ग्रंथ आणि काव्यांची रचना केली. 'गंगालहरी' काव्याची मांडणी त्यांनी 'शिखरिणी' वृत्तात केली आहे. मानवी जीवनाच्या विविध भावभावनांचे दर्शन त्यांनी आपल्या काव्यातून घडवले. ह्या काव्यात पंडितांनी गंगेचा महिमा आणि तिच्या विविध गुणांचे वर्णन केले आहे. ते म्हणतात, माझ्या उध्दारासाठी मी तुझा आश्रय घेतला आहे. आता हे भागीरथी, तूच जर माझी उपेक्षा केलीस तर मी कोणाकडे पहावे?

श्री.द.गो.पाध्ये यांनी म्हटले आहे की, “आद्यकवी वाल्मिकिंपासून व्यास, भास, कालिदास, बाण, भवभूती, दंडी, भारवी, माग्ज, जयदेव इ. कविवर्यांनी आपल्या बुध्दीचातुर्याने आणि काव्यालंकाराने वागयुवतीस नटवले, तर पंडितरायांनी आपल्या काव्यमाधुरीने तिची स्तुती केली.

श्री. पांडुरंग शास्त्री आठावले यांनी गंगालहरी काव्यावर प्रवचने दिली. त्या प्रवचनांचे संकलन ‘गंगालहरी’ या पुस्तकात केले आहे. त्यात ते म्हणतात, “गंगा शब्दाचा अर्थ ‘गम्यते प्राप्यते भगवत्पदं येन सा गंगा’ याचा अर्थ गंगा म्हणजे अविरत वाहणारा ईश्वराचा प्रेमप्रवाह. ज्या प्रेमप्रवाहाचा अनुभव झाल्यावर भगवत्पद प्राप्त होते.” पुढे ते म्हणतात, “गंगालहरी पूर्ण होतच नाही असं वाटतं. गंगालहरी दर्शन आहे. एक वेगळा दृष्टीकोन आहे. मानवाचे डोळे बिघडले तर ते सुधारता येतात पन जीवनाकडे बघायची दृष्टी बदलायला नको. गंगालहरी पापहारीणी आहे.”

गंगाधाम गंगोत्रीला सकाळपासून संध्याकालपर्यंत यात्रेकरूंची ये-जा चालू असते. भक्त गंगामैयाचा जयजयकार करत असतात. गंगेची खरी आराधना सांजआरती पासून सुरु होते. भागीरथीच्या डोहातून उठणाऱ्या संगीत लहरी जेव्हा गंगालहरी मध्ये एकरूप होतात त्यावेळी भक्त भावसागरात तरंगू लागतात, त्या भावनेतून पंडितराजांनी काशीच्या घाटावर बसून गंगालहरीची रचना केली. ‘गंगालहरी’ गंगामैयाचे श्रेष्ठ काव्य आहे. गंगोत्रीला सांज आरती नंतर रोज ‘गंगालहरी’चा पाठ होतो.

(तळटिप: पंडितांच्या जीवनाविषयी अनेक वेगवेगळ्या दंतकथा प्रसिध्द आहेत. वरील माहिती आंतरजाल आणि काही व्यक्तींशी संवाद साधून मिळाली आहे.)



अमृतधारा

# आओ मिलकर साथ चले...

सुंदर सपना हमने देखा
दुनिया बेहतर बनाएँगे
सात्विकता की राह को
पहचान अपनी बनाएँगे

हर रोज की काम काज में
आध्यात्मिकता रहे आगे
शिक्षा हो ऐसी अपनी
भीतर का दिव्यत्व जागे

ज्ञान का अनुभव करे
प्रज्ञा का हम मार्ग चुने
ध्यान करे, और ध्यान रखे
सचेत नित्य कर्म करे

बढे कदम आगे हमेशा
कमजोरियों पर मात करे,
बाटे खुशियां, प्रकाश बने हम,
अविरत अच्छा कार्य करे

भिन्न लोग, पर एक ध्यास से,
चलो भाव के साथ जुडे
आओ मिलकर हाथ बढाये
साथ चले और साथ बढे

प्रांजल जोशी, पुणे.





# मांजर आणि अंधश्रद्धा

एका गावात एक जमिनदार कुटूंब राहत होते. कुटुंब तसे घरंदाज आणि एकदम खानदानी. ह्या सधन कुटुंबात वर्षाला एकदा शक्यतो श्रावण महिन्यात महापूजा असायची. पूजेचा थाटमाठ काही आगळाच असायचा. घरात एक कर्ता पुरूष, त्याची पत्नी आणि त्यांची मुले-बाळे, नातवंडे असा पसारा होता. त्या घराच्या कर्त्या पुरूषाला मांजरांबद्दल खूप प्रेम होते म्हणून त्याने एक छानसे मांजरही पाळले होते. त्या मांजराला घरामध्ये सर्वत्र संचार करण्याचे जणू अधिकारच होते. परंतु पूजेच्या दिवशी मात्र ह्या लाडावलेल्या मांजराची धावपळ सर्वांनाच त्रासदायक वाटायची. ठेवलेला नैवेद्य हे तर मांजराचे विशेष आकर्षणच होते जणू. त्याला एका जागी ठेवणे हे तसे सर्वांनाच कठीण व्हायचे.

शेवटी कंटाळून त्याच्या मालकाने एक युक्ती रचली. त्याने एक वेताची जड अशी टोपली आणली आणि पूजेच्या काळामध्ये त्या मांजराला झाकून ठेवले. पूजा पूर्ण झाली आणि सगळे आटोपले कि मात्र त्या मांजराला मालकाने मुक्त केले. एका वर्षी यशस्वी झालेली ही युक्ति मग दरवर्षीच वापरात यायला लागली. अशी काही वर्षे गेली आणि एक दिवस काळाला अनुसरून त्या मालकाने राम म्हटला. मालकाच्या मृत्युच्या आगेमागेच त्या मांजरानेसुद्धा प्राण सोडला. त्यांच्या निधनानंतर कर्तेपणाचा वारसा त्याच्या मुलाकडे चालत आला. अर्थातच वार्षिक पूजेला सुद्धा तोच आता यजमान झाला. पूजेचा वेळ आला आणि त्या यजमानाला लक्षात आले कि सगळी तयारी तर जय्यत झालेली आहे परंतु मांजराचे काय? अचानक सगळ्यांच्याच लक्षात आले कि मांजर तर आता घरात नाही. मग कोठून आणायचे मांजर? यजमान व्याकुळ झाला. कारण आतापर्यंतची घराची आणि पूजेची परंपरा सोडून चालणार नव्हते. वडीलांचा आत्मा काय म्हणेल? मग धावपळ करून त्यांनी कोठून तरी एक मांजर मिळविले व त्याला आणून एका मोठ्या टोपलीखाली झाकून टाकले व पूजाविधि पार पडला. पूजाविधि होऊन सगळे आटोपल्यावर त्या मांजराला जेथून आणले होते तेथेच सोडून दिले.

मग काही वर्षे अशीच गेली. दरवर्षी श्रावणात पूजा व्हायची आणि दरवर्षी कोठूनतरी मांजर पकडून आणले जायचे कोठल्यातरी टोपलीखाली झाकले जायचे व पूजा पूर्ण व्हायची. एके वर्षी एक पाहुणा त्यांच्या घरी आला होता. त्याने हे पाहीले व विचारपूस केली कि हे मांजर तुम्ही का पकडून आणता व त्याला का झाकून ठेवता? कारण कोठल्याही पूजाविधित असे असल्याचे त्यांना माहित नव्हते व ते तर धार्मिक विधिंचे अभ्यासू होते. चौकशी करता पत्ता लागला कि त्यांच्याकडे पाळलेल्या मांजराचा उच्छाद थांबविण्यासाठी त्यांच्या एका पूर्वजाने ही पद्धत अवलंबिली होती. पण ते मांजर तर कधीच गेले होते व त्यानंतर त्यांच्या घरात मांजर पाळलेच नव्हते. हे समजल्यावर घरवाल्यांनी आपापल्या डोक्यांवर हात मारून घेतला व साहाजिकच ही प्रथा नंतर बंद करण्यात आली.



तात्पर्य: एखाद्या अंधश्रद्धेचे मूळ शोधून काढल्यास ती अंधश्रद्धा दूर करण्यास काहीच बाधा येत नसते. किंवा एखाद्या पारंपारिक रूढीचे मूळ शोधल्यास त्याचातील विज्ञानही गवसू शकते. मूळापर्यंत जाणे महत्वाचे.



(लेखांक १२)

## जाहल्या स्वामीराज वैद्य, व्याधी पळे आपणची...

# रावण्णाला सर्पदंशातून वाचवले

एकदा स्वामी फिरता फिरता अक्कलकोटच्या नजीक एक कोस दूर असलेल्या बागेहाळी या गावी गेले. तेथे मुजावर नावाचा एक मुसलमान राहत होता. त्याच्याकडे दोन प्रहर राहीले आणि भर दुपारच्या उन्हात चालत निघाले. सगळीकडे कशी उन्हाची लाही लाही झालेली. बरे स्वामी कोठे निघाले होते हेही कोणालाच माहीत नव्हते. स्वामी म्हणाले, "तेथे पोहोचले कि गंमत बघायला मिळणार, पण रस्ता दुर्गम आहे. चला." सेवेकऱ्यांपैकी कोणाचे भोजन वगैरे झालेले नव्हते. त्यातच अशी उन्हाची झळ. एक एक करून सेवेकरी दूर जाऊ लागले. शेवटी स्वामींबरोबर उरले ते केवळ ४ ते ५ सेवेकरी. त्यामध्ये एक बाबासाहेब (दरबारी) होते.

अचानक चालता चालता महाराजांनी इटगीचा रस्ता धरला. तीन वाजताच्या सुमारास ते गावातील मारूति मंदिरात जाऊन बसले. सकाळपासून स्वामींचे स्नान वगैरे काहीच झालेले नव्हते. गाववाल्यांनी स्वामींना हुक्का भरून दिला. पण त्यावेळेला स्वामींनी हुक्का पण स्विकारला नाही. बाजूलाच पडलेल्या बाजरीच्या भुशाचा गोळा करून आणायला त्यांनी आपल्या सेवेकऱ्यांना सांगितले. ते थंडीचे दिवस होते. त्यामुळे शेकोटीसाठी बाजरीचा भुसा गोळा केला होता. त्याच दिवशी साधारण चार वाजता रावण्णा नावाचा एक वाणी आपल्या शेतात नांगर चालवत होता; त्याला सापाने दंश केला. त्याला सतत आंकडी यायला लागली. त्याच्या नातेवाईकांनी त्याला एका झोळीत घालून मारूति मंदिराच्या मंडपात आणून बसवला. सापाचे विष चढू लागल्यामुळे त्याचे अंग गार पडू लागले. आता त्याच्या जगण्याची आशा कोणालाच नव्हती.

महाराजांचे सेवक हे सगळे बघत होते. त्यावेळेला बाबासाहेबांनी स्वामींचा जोडा नेऊन रावण्णाला आराम पडेल या भावाने रावण्णाच्या डोक्यावर ठेवला. सगळे ठीक होईल या एकाच आशेने बाबासाहेबांनी हे केले होते. त्यांच्या मनात हा विचारच शिवला नाही कि कोणाच्या पादुका, त्याचा प्रभाव काय होईल, त्याचा काही दुष्परिणाम झाला तर नाव कोणाचे खराब होईल. परंतु रावण्णाची आयुष्याची रेषा बलवान होती. म्हणूनच बाबासाहेबांच्या मनात तो जोडा ठेवण्याचे आले असेल. जमिनीवर पडून आराम करणाऱ्या महाराजांना अचानकजाणिव झाली कि आपलाच जोडा कोणीतरी रावण्णाच्या डोक्यावर ठेवला आहे. ते रागाने लालबुंद झाले आणि त्यांना प्रचंड क्रोध आला.

स्वामी ओरडले, "मयताच्या डोक्यावर जोडा का ठेवला?" खूप रागाने स्वामी बाबासाहेबांना शिव्यागाळी करू लागले. मंदिरात तोवर माणसांची गर्दी झाली होती. स्वामींचा राग पाहून बरेचशे पळून गेले. बाबासाहेब घाबरून दूर जाऊन उभे राहीले. परंतु दोन माणसे रावण्णाच्या बाजूला बसून राहीले. स्वामींनी आपल्या डोक्यावरची टोपी आणि अंगावरची कफनी काढून जमिनीवर फेकली आणि आपली लंगोट काढून फेकून दिली. स्वामी दिगंबर अवस्थेत गेले. इथे बाबासाहेबांना दरदरून घाम सुटला. एक एक पाऊलाने स्वामी त्यांच्या दिशेने जाऊ लागले. स्वामींच्या मुखातून शिव्यांची सरबत्ती चालूच होती. स्वामींचा क्रोधावतार भयंकर होता. बाबासाहेब थरथर कापतच स्वामींच्या जवळ आले. स्वामी पुन्हा ओरडले, "मयताच्या माथ्यावर जोडा ठेवायला तुला कोणी सांगितले?" बाबासाहेबांनी उत्तर दिलेच नाही. मग महाराजांनी बाबासाहेबांना पण स्वत:ची पगडी काढून फेकून द्यायला सांगितले. बाबासाहेबांनी तसेच केले. महाराजांनी त्यांना अंगातला डगला पण काढून टाकायला सांगितला. आता बाबासाहेबांना भीति वाटली कि आपल्यासारखेच स्वामी आपणाला दिगंबर करत आहेत कि काय? परंतु तसे काही झाले नाही.

महाराजांनी मग बाबासाहेबांना सांगितले कि “रावण्णाचे नाव घेऊन त्याच्या कानात हाक मार”. बाबासाहेबांनी तसे केले पण काही फरक पडला नाही. काहीच प्रतिसाद मिळाला नाही. महाराज म्हणाले, “आणखी मोठ्याने ओरड”. परंतु त्याचाही काही उपयोग दिसेना. “दुसऱ्या कानात हाक मार मोठ्याने” स्वामी जोराने म्हणाले. बाबासाहेब मोठ्यांदा म्हणाले, “रावण्णा, रावण्णा..” तुरंत रावण्णाने डोळे उघडले आणि जमलेल्या लोकांकडे पाहीले. सर्व स्वामीभक्तांना प्रचंड आनंद झाला आणि त्यांनी स्वामींचा जयजयकार केला. “श्री स्वामी समर्थ महाराजकी जय” असे सगळ्या मंदिरात दुमदुमु लागले. काही वेळातच रावण्णा पूर्ण शुद्धीवर आला आणि म्हणाला, “मला प्रचंड भूक लागली आहे, काहीतरी खायला द्या”. रावण्णाच्या नातेवाईकांनी स्वामींना विचारले कि याला खायला काय द्यायचे? स्वामी म्हणाले, “खीर द्या”. ताबडतोब त्या लोकांनी रावण्णासाठी खीर आणि स्वामींसाठी खीर व इतर खाद्य पदार्थ आणले. रावण्णाने खीर खाल्ली. खरे म्हणता ज्याला सर्पदंश झाला आहे त्याने दूध वर्ज्य करावे असा साधारण समज असतो. परंतु स्वामींवर पूर्ण श्रद्धा ठेवून रावण्णाने दुधाची खीर खाऊन टाकली. रावण्णा आता पूर्णपणे पूर्ववत झाला.

परंतु आपल्या स्वत:च्या चरण पादुकांद्वारे, दिनदयाळु-कनवाळु स्वामींनी, प्रेतवत रावण्णाला जीवनदान दिले. एवढे महाराजांचे अफाट सामर्थ्य होते. ह्या सामर्थ्याचे वर्णन करणे मानवाला शक्यच नाही. महाराजांनी दिलेली भोजनाची थाळी महाराजांनी घेतली नाही, ती प्रसाद म्हणून सर्वांना वाटून टाकण्याचा आदेश दिला. नैवेद्य झाल्यावर बाबासाहेबांसाठी एक पूर्ण थाळी आणावयास सांगितले. त्यांना यथेच्छ भोजन करवले. त्या दिवशी महाराजांचा मात्र उपवासच झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून महाराज रामपूरला गेले व तेथे त्यांनी पाटील यांच्या घरी स्नान करून भोजन केले.

**(संदर्भ: अक्कलकोटनिवासी स्वामी समर्थ महाराज चरित्र, लेखक: कै गणेश बल्लाळ मुळेकर)**

# आश्रम स्पंदन

ऑनलाईन सेशन द्वारे सुरु केलेले ‘गुरुचरित्र अध्ययन’ आता अजून गहन होत चालले आहे. समुद्र मंथनातून जशी एक-एक रत्ने बाहेर आलीत, तशाप्रकारे गुरुजी प्रत्येक अध्यायाद्वारे ज्ञानांनी भरलेली एक-एक रत्ने आपल्या साधकांपुढे ठेवत आहेत. यावेळेस त्यांनी ‘दुर्वा’ या वनस्पतीबद्दल अतिशय मौलिक माहिती दिली. ‘मूर्ती लहान पण किर्ती महान!’ अशी दूर्वा दिसायला लहान असली तरी गुणांनी महान आहे. त्रिदेवांचा वास असलेली ‘दुर्वा’, तिच्या मुळाशी ‘रुद्र-देव’ मध्यभागी ‘विष्णू-देव’ आणि मस्तकावर ‘ब्रम्हदेव’ विराजमान आहेत. गुरुजी दूर्वांबद्दल माहिती देत होते आणि आम्ही आश्चर्यचकित होत होतो.

इथे रुद्र, इथे विष्णू आणि ह्या भागात ब्रम्हदेव हे इतके अचूक कसे आणि कोणाला बरे जाणवले असेल? तसे पाहिले तर हर-एक अणू-रेणूंची उत्पत्ती त्रिगुणातून झाली. पण त्याचे इतके बारकाईने निरिक्षण आणि मोजमाप कसे करता आले? आपणही ह्या उर्जांना अनुभवू शकू का?

हे प्रश्न गुरुजींकडे मांडले असता, त्यांनी सांगितले की, “उर्जेबद्दल जाणून घ्यायचे दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग असा की आपल्या साधनेद्वारे स्वत:ला इतके सूक्ष्म करायचे की या उर्जांना आपण जसेच्या तसे अनुभवू शकतो आणि दुसरा मार्ग म्हणजे या उर्जांचे जेथे स्थूलरुपात प्रकटीकरण झाले आहे, त्या प्रकटीकरणातल्या उर्जेला ओळखणे. त्याकरिता तुम्हाला प्रत्येक क्षणी ‘सावध’ आणि ‘जागृक’ राहता आलं पाहिजे. बऱ्याच वेळेला आपण आपणच तयार केलेल्या विचारांच्या - भावनांच्या मानसिक गोंधळात अडकलेलो असतो. त्यामुळे या अद्भुत शक्तींनी दिलेले संकेत आपण समजू शकत नाही. आपणच विणलेले चांगल्या-वाईटाचे जाळे हे संकेत आपल्यापर्यंत पोहचू देत नाहीत. त्यामुळे सूक्ष्माची अनुभूती स्थूलरुपात होणे कठीण होवून जाते.

या सगळ्या जळमटांना घालवण्याकरिता **‘नित्य-जागृती, नित्य-ध्यास, नित्य-साधना’** हा एकमेव उपाय आहे.”

# स्वामी विवेकानंद आणि ध्यान



**लेखांक ६ वा**

**लेखक: श्री प्रांजल जोशी, पुणे**

अध्यात्मिक जीवनात सर्वतोपरी सहाय्य करते ते म्हणजे 'ध्यान'. कारण ध्यानामध्ये आपल्या सभोवतालच्या सर्व भौतिक गोष्टींपासून विलग होऊन, आपण आपल्या स्वत:च्याच दिव्य स्वरुपाचा अनुभव घेऊ शकतो. सर्वात महत्वाचे म्हणजे ध्यानासाठी आपण कोणत्याच बाह्य गोष्टींवर अवलंबून नसतो. आत्म्याचा तो दिव्य स्पर्श, कोंदटमय दशदिशाही उजळून टाकु शकतो, दुष्टतेला सुष्टतेत अन दुर्गंधाचे सुगंधात परिवर्तन करू शकतो; दुष्ट, दुर्जन वा पापी माणसाचाही कायापालट करू शकतो. जेवढा शरीर अन शारीरिक व भौतिक गोष्टींबद्दल कमी विचार, तेवढे अधिक चांगले, अधिक हितकारक. कारण ह्या शरीर वासनाच आपल्याला बंधनात अन प्रलोभनात अडकवून अगदी हवालदिल करतात.

म्हणूनच 'मी' – म्हणजे हे शरीर नसून आत्मा आहे. अन या विश्वातील सर्व चांगल्या किंवा वाईट गोष्टी म्हणजे केवळ एए कॅनव्हास वरील चित्रांची जणू दीर्घ मालिका आहे, ज्याचा मी केवळ साक्षीदार आहे, हे समजणे, हेच खरे गुपित आहे.

## ध्यानसाधनेतून झालेल्या परिवर्तनाची कथा

एक धडधाकट तरूण मनुष्य होता. आपल्या कुटुंबाला पोसण्यासाठी अर्थार्जनाचा कोणताच पर्याय न मिळाल्यामुळे अखेर तो रस्त्यावरचा एक दरोडेखोर (वाटेकरी) बनला. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांवर हल्ला करून, त्यांना लुटून, त्यांना मारून, त्यांचे पैसे लुबाडून त्यातून तो त्याचा व त्यांच्या कुटुंबाचा – आई, वडील, बायको, मुले इ. च चरितार्थ चालवीत असे. हे असेच कित्येक दिवस सतत चालू होते. एके दिवशी नारदमुनी त्या रस्त्याने चालले होते. झाले, नित्य नेमाने याने नारद मुनींना देखील अडवले. नारदमुनी म्हणाले, "का रे बाबा, हे असे लोकांना का लुबाडतोस? चोरी करणे, मनुष्याची हत्या करणे हे महापाप आहे. तुला माहित नाही का? तरी असे मोठे पातक तू का बरे सातत्याने करतो आहेस?"

"का, म्हणजे काय विचारात? या चोरलेल्या पैशाने तर माझ्या कुटुंबाला मी पोसतो, त्यांच्यासाठीच तर हे सर्व मी करतो आहे." तो दरोडेखोर म्हणाला. "अस्से तर", नारदमुनी म्हणाले, "मग मला सांग, की तुला खरंच असे वाटते का, की तुझे कुटुंब देखील तुझ्या या पापात वाटेकरी आहेत?"

"नक्कीच! म्हणजे काय? नक्कीच ते मला माझ्या या पापात देखील साथ करतात" लुटारूने उत्तर दिले.

"वा, फारच चांगले!" नारदमुनी म्हणाले, "मग आता असे कर, मला येथेच बांधून ठेव, अन तू घरी जा आणि एकदा विचारून तरी ये तुझ्या सगळ्या कुटुंबातील लोकांना, कि ज्याप्रमाणे चोरी केलेल्या पैशात ते तुझे वाटेकरी आहेत, तसेच ते तुझ्या ह्या पापात देखील वाटेकरी आहेत ना?"

नारद मुनींनी सांगितल्याप्रमाणे, खरेच तो माणूस प्रथम आपल्या वडिलांकडे गेला आणि त्यांना त्याने विचारले, "बाबा, मी आपल्या सर्व कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करतो, त्यासाठी पैसे कोठून आणतो, हे तुम्हाला ठाऊक आहे काय?" वडिलांनी उत्तर दिले, "नाही रे, मला नाही ठाऊक तू कसे पैसे मिळवतोस ते."

“मी लुटारू आहे, मी माणसांना मारतो आणि त्यांना लुटतो.” तरूण म्हणाला. “काय?” वडिल चपापलेच, “अरे नतद्रष्टा, तू असे महापाप करतोस? निघून जा इथून, अन पुन्हा तुझे तोंड मला दाखवू नकोस.” नंतर तो त्याच्या आईकडे गेला आणि तिला त्याने विचारले, “आई, तुला हे माहित आहे का, की मी दरोडा घालून, चोरी करून पैसे मिळवतो?” “काय? किती भयानक आहे हे!” आई तर ओरडलीच, “आई, तू माझ्या या पापात वाटेकरी होशील ना?” मुलाने तरीही धीर करुन विचारले. “मी? मी का तुझ्या पापात वाटेकरी होईन? मी कधीच चोरी केली नाही, दरोडा टाकला नाही, मी कदापिही तुझ्या या पापात वाटेकरी होणार नाही.” आईने उत्तर दिले. मग तो आपल्या बायकोकडे गेला आणि तिला विचारले, “अग, मी तुम्हा सर्वांना कसे सांभाळतो, त्यासाठी पैसा कुठून आणतो, हे माहित आहे का?” “नाही, मला नाही माहित तुम्ही आपल्या चरितार्थासाठी पैसा कसा आणता ते.” ती म्हणाली.

“मी एक लुटारू, दरोडेखोर आहे, रस्त्यावरच्या लोकांना मी लुबाडतो, मारतो अन त्यांचे द्रव्य चोरुन मी तुमचा सांभाळ करतो. अन असे हे कित्येक वर्ष मी करतो आहे, अन खरंतर, हे सर्व मी तुमच्यासाठीच करतो आहे आणि आता मला हे जाणून घायचे आहे की माझ्या या पापात वाटेकरी होण्यास तू तयार आहेस ना?” तरूणाने विचारले.

“मुळीच नाही, मी का तुझ्या पापात सहभागी होऊ? तू माझा नवरा आहेस, अन माझा सांभाळ करणे हे तुझे कर्तव्य आहे.” बायकोने निक्षून सांगितले.

हे सर्व ऐकून दरोडेखोराचे डोळे उघडले, “केवढे कठोर आहे हे सगळे? ही जगरहाटीच अशी आहे, अगदी माझे स्वत:चे जवळचे नातेवाईक, ज्यांच्यासाठीच मी हे सर्व पाप करीत आहे, चोऱ्या माऱ्या करीत आहे, ते देखील, माझ्या पापात सहभागी होण्यास तयार नाहीत.” ज्या ठिकाणी त्याने नारद मुनींना बांधले होते, तिथे तो परत आला. त्याने नारद मुनींना बांधलेले दोर कापून त्याचे तुकडे केले आणि त्यांच्या पायावर लोटांगण घातले. त्यांना घडलेला सर्व वृत्तांत सांगितला आणि हात जोडून अखेर तो म्हणाला, “महाराज, मला वाचवा! मी हे काय करून बसलो? आता काय करू मी?”

नारदमुनी म्हणाले, “हा तुझा सध्याचा जीवनक्रम आता सोडून दे. आपल्या कुटुंबातील लोक देखील आपल्यावर खरे प्रेम करत नाहीत, त्यामुळे हा मायेचा भ्रम आता सोड. लक्षात ठेव, तुमची भरभराट झाली तर सर्वजण वाटेकरी होतील, पण तुमच्या पापात, तुमच्या दुष्कृत्यात कोणीही कधीच सहभागी होणार नाही. आणि म्हणूनच त्या सर्वश्वराला, नारायणाला शरण जा, त्याची उपासना कर, जो सदैव आपल्याला साथ देतो, आपण चांगले वागू वा वाईट, आपल्या सोबत असतो, नव्हे आपल्यावर खरे, निस्सीम प्रेम करतो, त्याला घेण्या–देण्याचा व्यवहार ठाऊक नाही, कारण खरे प्रेम आपली साथ कधीच सोडत नाही. ते निस्वार्थी, निरपेक्षी असते कारण ते भगवंताचे असते.”

मग नारदांनी त्याला उपासना कशी करावी हे शिकवले आणि हा माणूस देखील सर्व काही सोडून जंगलात गेला. तेथे त्याने ध्यान साधना अन शिकवलेली उपासना केली. जोपर्यंत तो स्वत:ला पूर्णपणे विसरला नाही तोपर्यंत त्याने प्रार्थना आणि ध्यान केले, त्याच्या शरीराभोवती मुंग्यांनी मोठे वारूळ केले, असेच कित्येक दिवस गेले.

बरीच वर्षे उलटल्यानंतर एक दिव्य आकाशवाणी झाली, “उठ, हे महर्षी उठ!” या हाकेने काहीसा गोंधळून तो उद्गारला. “महर्षी? मी? मी तर आहे डाकू, दरोडेखोर!”

“ते तू होतास, पण आता नाहीस.” त्या आवाजाने उत्तर दिले, “शुध्द अन पवित्र असा महर्षी आहेस तू, तिझे जुने नाव देखील आता गेले. तू इतक्या खोल ध्यानात निमग्न झालास की तुझ्या आजूबाजूला केलेल्या मुंग्यांच्या वारूळाचे देखील तुला भान राहिले नाही, म्हणून आजपासून या मुंग्याच्या वारूळातून जन्मलेला – अर्थात वाल्मिकी, ‘महर्षी वाल्मिकी’ असे तुझे नवालौकिक होईल.

(क्रमश:)



# वाहतो ही दुर्वांची जुडी..



चार पाच दशकांपूर्वी ह्या नावाचेच एक नाटक फार गाजले होते. भारतिय संस्कृतित नात्यांना फार महत्व दिले जाते. भावा–बहिणीचे नाते तसे पाहीले तर फारच दिव्य. ह्याच नात्यातील दिव्यत्वाचा साक्षात्कार ह्या नाटकामधून होता. दुर्वा हे भारतिय संस्कृतिचे एक ठाम प्रतिक मानायला हरकत नसावी. भारतिय संस्कृतिच ह्या दुर्वांसारखी मृदु, विनम्र, पवित्र आणि सगळ्यांचे मंगल करणारी आहे हे तर आपण जाणतोच.

दुर्वा ह्या श्री गजाननाला वाहील्या जातात. वाहण्यामध्ये समर्पण आहे. एकदा वाहीले कि त्यावर आपला अधिकार राहत नाही. वाहण्याचा तसा दुसरा अर्थही प्रवाही आहे. त्यात नविनपणाचा संकेत आहे. समर्पणसुद्धा प्रवाही असते. ते एकाच दिशेने वाहते. त्यात परत घेण्याचा किंवा परत येण्याचा प्रश्नच येत नाही. त्यात एक नैसर्गिकता आहे.

साधारण आपण पाहतो कि एखाद्या सणा–सुदीला आपण देवतांचे पूजन करतो. त्यांना फळे, पेढे, भोजन असा नैवेद्य दाखवतो. त्या नैवेद्यातील सार सूक्ष्म रूपाने ग्रहण करून ती देवता आपल्या आशिर्वादांनी त्या नैवेद्याचा प्रसाद बनवते. भक्त लोकच त्या प्रसादाचा लाभ घेतात. त्यामुळे सर्वच सणांमध्ये भक्तांना जे त्या त्या ऋतुमध्ये उचित आहे तेच देवतांना वाह्यले जाते. कारण शेवटी फिरून ते पुन्हा भक्तांच्याच वाट्याला येते. दुर्वा ही सुद्धा अशीच एक वनस्पति आहे जिचा मनुष्याला फार मोठा उपयोग आहे.

पहिली गोष्ट म्हणजे दुर्वा ह्या सर्वच ऋतुंमध्ये फायदेशीर असतात. त्यामुळे वर्षभर त्यांचा उपयोग केला जातो. त्यासाठी वेदांमध्ये असे म्हटले आहे कि श्रावण महिन्याच्या अमावास्येला जर दुर्वा तोडल्या तर त्या वर्षभर न खराब होता टिकतात. दुसऱ्या कोठल्याही दिवसाला ही गुणवत्ता नाही. यावरून लक्षात येईल कि आपल्या संस्कृतिमध्ये निसर्गाचाच नव्हे तर निसर्ग आणि माणूस यांच्या तादात्म्यतेचा केवढा बारकाईने अभ्यास केला गेला आहे. दुर्वांसंबंधी खालील माहिती सामान्य जीवनात खूपच क्रांति घडवून आणणारी आहे हे निश्चित.

१) दुर्वांच्या पात्यावर त्रिमूर्तिचे स्थान असल्याचे मानले जाते. दुर्वेच्या मुळाशी भगवान रूद्राचे स्थान असते तर मध्य भागामध्ये भगवान विष्णुंचे स्थान असते. अगदी टोकाच्या भागावर भगवान ब्रह्मदेवांचे स्थान असते. अशी ही दुर्वा तीनही महाचैतन्यांनी अंगिकारलेली आहे.

२) ज्योतिष शास्त्रानुसार, भगवान गणेश हा केतु ग्रहाचा तसेच पृथ्वीतील सगळ्या सामुग्रीचा स्वामी मानला जातो. हा एकच देव आहे कि ज्याला दुर्वा वाहील्या जातात.

३) दुर्वा हा एक गवताचा प्रकार असून या गवतामध्ये कॅल्शियम, फॉस्फरस, फायबर (तंतु). पोटॅशियम आणि प्रथिने (प्रोटीन्स) असतात त्यामुळे मानवी स्वास्थ्यासाठी त्याचा फार उपयोग आहे हे आताच्या शास्त्रालाही मान्य झाले आहे.

४) दुर्वांच्या सेवनाने खालील विकार बरे होतात असे आधुनिक शास्त्रही मानते.

- ❖ आम्लपित्त दूर होते.
- ❖ रोग प्रतिकारक शक्ती (immunity) उभारली जाते जिची आज कोरोनाच्या काळात नितांत गरज आहे.
- ❖ रक्तातील साखर कमी होते जे मधुमेहाच्या रुग्णांना वरदान आहे.
- ❖ PCOS (Poly Cystic Ovarian Syndrome) सारखे महिलांचे गर्भाशयासंबंधीचे विकार बरे होतात. आजच्या पिढीतील मुलींमध्ये आणि महिलांमध्ये हा एक मोठाच विकार आहे ज्याला आधुनिक वैद्यक शास्त्रात कोठलाच उपाय नाही. या व्यतिरिक्त गर्भाशयासंबंधी इतर सर्वच विकारांवरती दुर्वा हा रामबाण उपाय मानला जातो.
- ❖ बद्ध मल कोष्ठता या विकारावर सुद्धा दुर्वांचा चांगला उपयोग होतो.
- ❖ लठठपणावर सुद्धा दुर्वा चांगला प्रभाव दाखवतात.
- ❖ हिरडयांच्या रक्तस्त्रावाला आळा बसतो.
- ❖ नेत्र विकारांवर चांगला उपाय.
- ❖ नाकातून रक्तस्त्राव होत असल्यास दुर्वा त्याच्यावर चांगला इलाज आहे.

दुर्वांना इंग्रजीमध्ये Cynodon dactylon असे नाव असून ते बर्मुडा ग्रास ह्या नावानेही जगभर प्रसिद्ध आहे.

# आश्रम वार्ता

## (१) साधकांचा अभिनव गोकुळाष्टमी उत्सव

कोणताही उत्सव आला की त्या मागोमाग उत्साह आणि आनंद येतोच. आणि आपले गुरुजी त्या उत्सवाला ज्ञानार्जनाची पण जोड देत असतात. इंटरनेट गोकुळाष्टमी उत्सवाचा कार्यक्रमही असाच साजरा झाला. मुंबई,ठाणे,वडोदरा आणि भावनगर येथील साधकांनी कृष्णाची सुंदर भजने गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. आपकी अदालत ह्या लोकप्रिय कार्यक्रमाच्या धर्तीवर आधारीत कार्यक्रम साधकांनी सादर केला. ह्यात चक्क कृष्णाला आरोपी ठरवून अदालत भरवली गेली. कृष्णावर केलेल्या आरोपांवर त्याने दिलेल्या समर्पक उत्तरांनी सर्वजण भारावून गेले. कृष्णाच्या प्रत्येक लीलेमागचा दृष्टीकोन त्यामुळे स्पष्ट झाला. या नाटीकेचे लेखन स्वत: गुरुजींनी केले होते.





## (२) देवरुख गणेशोत्सव

यंदाच्या वर्षी गणेशाच्या आगमनाने वातावरणात आलेली मरगळ क्षणात नाहीशी झालेली आपण सर्वांनीच अनुभवली. देवरुखच्या साधकांनीही आश्रमात गणेशोत्सव उत्साहात साजरा केला. दरवर्षी, आपले साधक श्री अवधूत पोटफोडे यांनी बनवलेली गणेश मूर्ती हे एक खास आकर्षण असते. ह्यावर्षी आश्रमात मयूरेश्वर स्वरुपात (मोरावर विराजमान) गणेशाचे आगमन झाले. दिड दिवसांचा गणेश उत्सव साधकांमध्ये नवचैतन्य निर्माण करून गेला.


## (३) अमेरिकेतील मुलांसाठीचे "सॉफ्ट शिबीर"

NGDI आणि DSPPL यांच्या संयुक्त विद्यमाने अमेरिकेतील १० ते १४ या वयोगटातील मुलांसाठीचे ऑनलाईन शिबीर २ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२० या कालावधीत पार पडले. या मध्ये १३ मुलांचा सहभाग होता. योग, खगोलशास्त्र, मूल्य शिक्षण, नैसर्गिक बुध्दीविकास,कर्माचा सिध्दांत इ. विविध विषयांवर दररोज ४ अशा एकूण ४० सत्रांचा या मध्ये समावेश होता. चीजी कार्डसच्या चित्रांचा प्रथमच ऑनलाईन सत्रांमध्ये कल्पकतेने उपयोग करून स्व-संशोधनाचा वर्ग घेण्यात आला व त्याला सर्वच मुलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शांतिमंत्र आणि त्याचा दैनंदिन जीवनातील उपयोग यावर गुरुजींनी केलेले विवेचन आणि गुरुजींच्या पाठोपाठ शांतीमंत्राचा उच्चार करुन घेतलेला शांतीचा अनुभव या शिबिरांचे ठळक वैशिष्टय ठरले. स्वप्न, त्याचे प्रकार आणि त्याचा उपयोग, मूल्य शिक्षण सत्रामध्ये "काय जोपासायचे" तर ड्रॉप इट या सत्रामध्ये "काय टाकायचे, सोडून द्यायचे" असे एकमेकांना पूरक अभ्यासक्रम या शिबिरात हाताळले गेले. मानवनिर्मित बुध्दिविकास (Artificial Intelligence) करण्याआधी मानवस्थित बुध्दीचा पूर्ण विकास अन वापर करणे, या विषयावर देखील उहापोह करण्यात आला. शेवटच्या दिवशी मुलांची ऑनलाईन स्पर्धा घेण्यात आली, तर शेवटच्या सत्रात गुरुजींनी मुलांबरोबरच त्यांच्या पालकांशी देखील संवाद साधला.

## (४) कृष्णजन्माष्टमीचा ऑनलाईन आनंद –सोहळा

आनंदासाठी स्थळ काळाची मर्यादा आड येऊ शकत नाही. प्रत्यक्ष एकत्र भेटता आले नाही, म्हणून काय झाले? DSPPL चे सर्व बालगोपाल, त्यांचे पालक, सर्व शिक्षक यांनी कृष्णजन्माष्टमीचा ऑनलाईन सोहळा अगदी उत्साहात पार पडला. चित्रकला, निबंध अन गीतापठण स्पर्धा देखील या निमित्ताने पार पडल्या. जन्माष्टमीच्या दिवशी तर निवडक मुलांनी (रोज सराव करून) कृष्ण गीते गायली, गीता पठण स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळालेल्या मुलाने गीतेचा १२ वा अध्याय तोंडपाठ म्हणून दाखविला, अन या सर्वांवर कडी म्हणजे प्रथमच झालेले ऑनलाईन "गोपाळदादा" नावाचे नाटक. स्वत: गुरुजींनी लिहिलेली संहिता, अन DSPPL च्या गुणी शिक्षकांनी फोनवरून तसेच ऑनलाईन पध्दतीने मुलांकडून करून घेतलेली रोजची नाटकाची तालीम! सर्वकाही अप्रतिम अन भारावलेले! नाटकातील काही पात्रे पुण्यामधून, काही मुंबई, गुजराथ मधून तर काही बंगलोर, चेन्नई मधून आपापले संवाद म्हणत होती, जणू हा ऑनलाईन नाटाकाचा अविष्कारच एक "कृष्ण लीला" होती.

कार्यक्रमाच्या शेवटी चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. एका अविस्मरणीय सोहळ्याचे साक्षीदार झाल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन अन आभार !



## (५) गणेश चतुर्थीचा ऑनलाईन कार्यक्रम



२१ एप्रिल २०२० पासून DSPPL ने चालू केलेली ऑनलाईन कार्यक्रमांची मालिका आजपावेतो अखंडित चालूच आहे, सण आणि कार्यक्रम यांचा तर अतूट संबंध! DSPPL तर्फे गणेश चतुर्थीला ऑनलाईन कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सहभागी मुलांनी गणेश वंदनेने केली, संस्कृत, हिंदी अन मराठी अशा तीनही भाषेमध्ये गणेश गीते सादर करण्यात आली, हे आणखी एक वैशिष्ट्य! आपल्या माधवी सप्तर्षी अन गायत्री या शिक्षकांनी देखील सुरेल गणेश गीते सादर केली. त्यानंतर DSPPL च्या शिक्षाकांनी – कल्पिताताई, कोमल पुकाळे, मृणाल कुटुंबळे आणि प्राजक्ता विसपुते यांनी गणेश कथा सादर केल्या व या सर्वांचे सुसूत्र विवेचन मीना भावे यांनी आपल्या उत्कृष्ट सूत्रसंचालनाद्वारे केले. त्यानंतर DSPPL च्या सर्व मुलांनी आपापल्या घरी केलेल्या 'गणेश आरासीच्या फोटो संकलनाचे', ओंकार किरपेकर यांनी सादरीकरण केले. या सर्वांमध्ये धैर्य चांडक या मुलाने सादर केलेली, पाणी नियोजनावर आधारीत संकल्पना फारच अप्रतिम होती. कार्यक्रमाचा शेवट गणेश आरतीने करण्यात आला.

# रेकि विद्या निकेतन आणि कोरोना आव्हान

मार्च २०२० पासून सुरू झालेला कोरोनाचा दहशतवाद अजूनही चालूच आहे. शारीरिक अस्तित्वाला धोका बनून राहिलेला हा भयंकर प्रकार आता मानवाच्या मनात शिरून मानवाचे अस्तित्व पोखरतोय अशी अवस्था दिसत आहे. ह्या आव्हानात रेकि विद्या निकेतनची भूमिका काय होती आणि आहे हे समजून घेणे आवश्यक आहे. स्वामींच्या कृपेने रेकि विद्या निकेतनने २०१९च्या उत्तरार्धात भारत सरकारच्या आयुष्मान भारत या योजनेतील ३६०च्या आसपास डॉक्टरांना रेकिचे प्रशिक्षण दिले. त्या डॉक्टरांचे रेकिचे ज्ञान आणि अनुभव कोरोना दरम्यान कामी आलेच असावे. ह्या कठीण परिस्थितीत कोरोना रूग्णांना रेकि देण्यास बऱ्याचश्या रेकि साधकांनी तयारी दाखवली होती व ती परवानगी मिळण्यासाठी बऱ्याचश्या साधकांनी शासकिय स्तरावर प्रयत्नही केले होते त्यांना यश मिळाले नाही. जमावबंदी, प्रवासबंदी इत्यादि कारणांनी रेकि देणे तसेच रेकि प्रशिक्षण या गोष्टींवर मर्यादा आल्या. तरीही भारतीबेन सारख्या रेकि शिक्षिकेने जराजर्जर स्त्रीचा जीव वाचविण्यासाठी अहमदाबाद सारख्या ठिकाणी रुग्णाच्या घरी जाऊन घरातील पाच व्यक्तींना रेकि प्रशिक्षण दिले याबद्दल रेकि विद्या निकेतन अभिमान बाळगते. त्याच काळात आपल्या श्री स्वामी समर्थ सेवक प्रतिष्ठानने निराश्रित नागरिक व पुण्यातील पोलिस यांच्यासाठी महिनाभर अन्नदान करून एक कर्तव्य समर्थपणे पार पाडले.

साधारण जुलैच्या अखेरीस निर्बंध शिथिल झाल्यानंतर नाशिक सारख्या केंद्राने सरकारी परवानगी मिळवून ८ व ९ ऑगष्टला २ऱ्या श्रेणीचे शिबिर आयोजित करून ही कोंडी फोडली. गुरूजी आणि राकेशकुमार यांनी नाशिकच्या योग शिक्षकांच्या चमूला रेकिची दुसरी डिग्री दिली. सामाजिक दुरांतर, मास्कचा वापर, प्रवेशाच्या वेळेला नियंत्रण, केवळ २०च विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण इत्यादि सर्व निर्बंध पाळून हे शिबिर केले गेले. त्यानंतर बडोदा, अहमदाबाद आणि राजकोट येथे अशी शिबिरे सर्व निर्बंध पाळून घेण्यात आली. ही शिबिरे आयोजित करताना आपल्या सगळ्याच केंद्र आयोजकांनी खूप काळजी घेतली याचाही आम्हाला अभिमान वाटतो. फक्त वैयक्तीक संपर्कातून आलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश, तोही Self Declaration अर्ज भरल्यानंतर, कमीत कमी दोन दिवस आधी नोंदणी, प्रशिक्षण केंद्रावरील सॅनिटायझेशन इत्यादि सगळ्या बाबींची काळजी घ्यावी लागत असल्याने ही शिबिरे घोषित करता येत नाहीत जो पर्यंत सरकारी पातळीवरील परवानगी मिळत नाही. यामुळेच आगामी शिबिरे हे सदर रेकिब्रह्मात आम्ही छापत नाही आहोत. ईच्छुकांनी आपापल्या नजीकच्या केंद्रांतील आयोजकाकडे चौकशी करावी ही विनंती.

## रेकि शिबिराची छायाचित्रे:









